फक्त पत्रिकाच नव्हे, तर विचारांचा एक मंच जो समाजाला बदलण्याची क्षमता ठेवतो...


Rotary
रोटरी क्लब लातूर

RID : 3132
CLUB NO. : 15520

# चक्रधर

अंक तीसरा, ऑक्टोबर – २०२५

UNITE FOR GOOD





आदरणीय
राष्ट्रपिता
महात्मा गांधी
आणि
माजी पंतप्रधान
लालबहादूर शास्त्री
यांना जयंतीनिमित्त

## विनम्र अभिवादन..!

### लालबहादुर शास्त्री
माजी पंतप्रधान

**जय जवान, जय किसान**
राष्ट्राच्या सुरक्षेसाठी सैनिक आणि अन्नासाठी शेतकरी हे दोन्ही 'महत्त्वाचे आहेत.

---

**शांती हीच मानवतेची खरी ओळख आहे.**
शांततेसाठी आपल्याला काहीही त्याग करावा लागला तरी तो करायला हवा.

---

**शिस्त ही आपल्या राष्ट्रीय जीवनाचा पाया आहे.**
शिस्त नसल्यास प्रगती शक्य नाही.

---

**लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून ती एक जीवनपद्धती आहे.**

### महात्मा गांधी
राष्ट्रपिता

**तुम्ही जगात पाहू इच्छिता तो बदल स्वत:मध्ये घडवा.**

---

**अहिंसा ही मानवी समाजातील सर्वात मोठी शक्ती आहे.**

---

**सत्य कधीही नष्ट होत नाही.**

---

**जगात प्रत्येकाच्या गरजा भागवायला पुरेसं आहे, पण प्रत्येकाच्या लोभासाठी नाही.**

---

**सत्य आणि प्रेम हेच माझी शस्त्रे आहेत.**



रो. फ्रान्सेस्को अॅरेझ्झो
अध्यक्ष-रोटरी आंतरराष्ट्रीय
(२०२५-२६)



रो. सुधीर लातुरे
प्रांतपाल
- प्रांत ३१३२



रो. जकी खान कायमखानी
अध्यक्ष : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)



रो. विश्वनाथ निगुडगे
सचिव : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)

सत्य, अहिंसा आणि साधेपणाचा मार्ग दाखवणारे महात्मा गांधीजी आणि जय जवान, जय किसानचा मंत्र देणारे लालबहादूर शास्त्रीजी यांच्या जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्याचे

**स्मरण करू या....**

# राष्ट्रीय एकात्मतेचे प्रेरक शिक्षक डॉ. संदीपान जगदाळे

## लातूरचा अभिमान : प्रामाणिक शिक्षक रो. संदीपान जगदाळे राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित

शिक्षक म्हणजे केवळ वर्गात अध्यापन करणारा व्यक्ती नसून तो समाज परिवर्तनाचा खरा शिल्पकार असतो. ज्ञान, मूल्ये, संस्कार आणि प्रेरणा यांची पेरणी करून तो समाजाचा कायापालट घडवतो. महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील दयानंद कला महाविद्यालयात मागील २३ वर्षांपासून कार्यरत असलेले डॉ. संदीपान गुरुनाथ जगदाळे हे अशा बहुआयामी शिक्षकांचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. त्यांचे कार्य अध्यापन, संशोधन, साहित्यलेखन, समाजसेवा, सांस्कृतिक प्रोत्साहन, डिजिटल नवकल्पना आणि राष्ट्रीय एकात्मता अशा अनेक क्षेत्रांत पसरलेले आहे.

**शैक्षणिक वाटचाल**

४ मार्च २००३ रोजी डॉ. जगदाळे दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तेव्हापासून त्यांनी सतत प्रामाणिकपणे अध्यापन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला आहे. गेल्या दोन वर्षांत त्यांनी एकही आकस्मिक किंवा वैद्यकीय रजा न घेता अध्यापन केले, यावरून त्यांच्या कर्तव्यपरायणतेचा प्रत्यय येतो.

**संशोधन व साहित्यलेखन**

ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी संशोधन आणि लेखनाची परंपरा जपली आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय अशा मिळून ४४ संशोधन लेख त्यांनी प्रकाशित केले असून विविध पत्रे व मासिकांत ४६ लेख प्रकाशित झाले आहेत. आतापर्यंत त्यांनी ९० हून अधिक लेखन प्रकाशित केले आहे. विशेष म्हणजे त्यांनी २५ पुस्तके लिहिली असून १६ पुस्तकांना आंतरराष्ट्रीय ISBN क्रमांक मिळाला आहे. यात संगीतविषयक ग्रंथ, पाठ्यपुस्तके, शिक्षक पुस्तिका आणि संपादित ग्रंथांचा समावेश आहे.

**परिषदा व कार्यशाळा**

ज्ञानाचा विस्तार व्हावा म्हणून त्यांनी अनेक परिषदांमध्ये सहभाग घेतला. ५ आंतरराष्ट्रीय, ९ राष्ट्रीय, १० सेमिनार आणि २२ कार्यशाळांमधून त्यांनी आपले विचार मांडले. यामुळे त्यांच्या संशोधनाला जागतिक व्यासपीठ मिळाले.

**डिजिटल शिक्षणातील योगदान**

डॉ. जगदाळे हे तंत्रज्ञानप्रेमी शिक्षक आहेत. कमी खर्चिक साधनांचा वापर करून ते ICT द्वारे अध्यापन करतात. त्यांच्या Sandeep Jagdale






या यूट्यूब चॅनेलवर २४३ शैक्षणिक व्हिडिओ अपलोड असून ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला आहे. तसेच त्यांच्या वेबसाइटवर सर्व पुस्तके मोफत उपलब्ध आहेत. कोरोना काळात दयानंद महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिले ऑनलाइन अध्यापन सुरु करणारे महाविद्यालय ठरले, याचे श्रेय त्यांना जाते.

**समाजाभिमुख उपक्रम**

शिक्षणापासून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. एचआयव्ही बाधित विद्यार्थी, अनाथ मुले, वडार आणि पोतराज समाजातील विद्यार्थी तसेच दिव्यांग बालिकांना शिक्षणाची संधी दिली. दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीत पुस्तके तयार करून मोफत वाटली. तसेच वडार बोलीवर आधारित मराठी मानक भाषेतील पुस्तक तयार करून FLN उपक्रमात महत्वाचा वाटा उचलला.

**सांस्कृतिक व क्रीडा योगदान**

संगीत, कला आणि क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्यांनी विशेष प्रोत्साहन दिले. महाविद्यालयातील २८ विद्यार्थी टीव्ही व चित्रपट अभिनेता झाले, तर २३ विद्यार्थी वर्ग १ व वर्ग २ अधिकारी झाले. अनेक विद्यार्थी शिक्षक व प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय युवा संसद, राष्ट्रीय संस्कृती महोत्सव व गिनीज बुक रेकॉर्डसारख्या उपक्रमात सहभाग घेतला आहे. अजिंक्य बिराजदार या विद्यार्थ्याने आंतरराष्ट्रीय लाठी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले.

सामाजिक कार्य

कोविड काळात लोकगीत, पोवाडा, टीव्ही व रेडिओच्या माध्यमातून त्यांनी जनजागृती केली. कैद्यांना योग प्रशिक्षण, वृद्धाश्रम भेट, तृतीयपंथी व वेश्यांना औषधे व साहित्य वितरण, मूकबधिर विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, मासिक पाळी स्वच्छता अभियान यांसारखे अनेक उपक्रम त्यांनी राबवले.

**राष्ट्रीय एकात्मता**

राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रनिर्माणासाठी त्यांनी ५२ उपक्रम राबवले. आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत ७५ व्याख्याने दिली. तिरंगा पदयात्रा, हर घर तिरंगा, हर घर संविधान, मतदार जनजागृती पोवाडा निर्मिती अशा उपक्रमांत सहभाग घेतला. तसेच बेंगळुरू येथील राष्ट्रीय एकता शिबिरात महाराष्ट्र पथकाचे नेतृत्व केले.

**राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार**

त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान केला. विज्ञान भवनात महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूजींच्या हस्ते मिळालेला हा सन्मान त्यांच्या अथक परिश्रमांचा सर्वोच्च गौरव आहे. या सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदीजींशी झालेली भेट, त्यांचे मार्गदर्शन आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानजींची आपुलकी हे सारे अनुभव डॉ. जगदाळे यांच्या आयुष्यातील सुवर्णक्षण ठरले. डॉ. संदीपान गुरुनाथ जगदाळे हे केवळ शिक्षक नसून संशोधक, लेखक, समाजसेवक, सांस्कृतिक दूत, डिजिटल इनोव्हेटर आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रेरक आहेत. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांसाठी, समाजासाठी आणि राष्ट्रासाठी अर्पण केले आहे. त्यांचा प्रवास हे सिद्ध करतो की प्रामाणिक परिश्रम, सृजनशीलता आणि सेवाभाव यांच्या बळावर शिक्षक एकाच वेळी ज्ञानसाधक, परिवर्तनकर्ता आणि राष्ट्रनिर्माते ठरू शकतात. त्यांना मिळालेला राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा योग्य गौरव असून तो लातूरसह महाराष्ट्राचाही अभिमान आहे. - **संपादक**

# रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ ॲस्पिरेशनची यशस्वी वाटचाल



रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ ॲस्पिरेशनची स्थापना जुलै २०२४ मध्ये करण्यात आली. त्यावेळच्या प्रांतपाल सौ. स्वाती हेरकल यांच्या उपस्थितीत क्लबच्या पहिल्या अध्यक्षा म्हणून डॉ. अर्चना लड्डा व सचिव म्हणून सौ. आनंदा कोचेटा यांचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला. मला २०२५-२६ या वर्षासाठी या क्लबचे अध्यक्षपद मिळाल्यामुळे क्लबच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम करण्याची संधी मिळाली. सदरचे कार्य मी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो. सुधीरजी लातुरे यांच्या प्रेरणेतून व मार्गदर्शनाखाली करत आहे.

रोटरीच्या माध्यमातून विविध क्षेत्रामधील महिलांना रोटरी पाठशाला व गरीब मुलींना आर्थिक मदत देऊन शिक्षणाची जबाबदारी घेण्यात येते. गरीब होतकरू मुलींना व महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी शिबिरांचे आयोजन करून त्यांना आरोग्याविषयीची माहिती देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येत आहेत व त्यामुळे त्यांच्यात सेवाभाव वाढत आहे. तसेच रोटरीच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण, वृक्षसंगोपन तसेच साक्षरता इत्यादी विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्यासाठी महिलांचा सहभाग वाढत आहे. रोटरीमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी माजी प्रांतपाल रो. स्वाती हेरकल यांचा मोठा सहभाग आहे. माझ्यासोबत रोटरीमधील सर्व महिलांचे सहकार्य मिळत आहे. रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. ज़की खान कायमख़ानी, सचिव रो. विश्वनाथ निगुडगे यांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे. रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल रो. हरीप्रसाद सोमाणी, रो. सुनील कोचेटा, रो.डॉ. विनोद लड्डा व सर्व रोटेरियन्स सदस्यांचे सहकार्य मिळत आहे. या सर्वांनी मला या क्लबच्या अध्यक्षपदावर काम करण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

**- रो. सौ. कौशल्या सोनकवडे**
अध्यक्षा, रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ अस्पिरेशन, लातूर

# ‘माझे जीवनच माझा संदेश’



प्रिय रोटरी परिवार,

ऑक्टोबर महिना आपल्या राष्ट्रीय जीवनात अत्यंत महत्वाचा मानला जातो. या महिन्याच्या २ तारखेला दोन थोर व्यक्तींचा जन्म झाला महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री.

गांधीजींनी सत्य आणि अहिंसेच्या माध्यमातून जगाला नवी दिशा दाखवली. त्यांचे विचार आजही आपल्याला सामाजिक बदलासाठी प्रेरित करतात. ’माझे जीवनच माझा संदेश आहे हे त्यांचे वचन आपल्या कार्याला मार्गदर्शन करणारे आहे.

लालबहादूर शास्त्रींनी ’जय जवान, जय किसान’ या घोषवाक्याद्वारे देशातील शेतकरी व सैनिकांना प्रेरणा दिली. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि दृढनिश्चयांचे ते जिवंत प्रतीक होते. या प्रेरणादायी वारशातून आपल्यालाही सेवा, त्याग आणि प्रामाणिकपणा या मूल्यांचे पालन करीत रोटरीचे कार्य पुढे न्यायचे आहे.

सप्टेंबर महिन्यात आपल्या क्लबच्या वतीने ’शिक्षक गौरव सोहळा आयोजित करण्यात आला. शिक्षक समाजाच्या जडणघडणीचे शिल्पकार आहेत. त्यांच्या परिश्रमांमुळेच विद्यार्थी घडतो आणि देशाला नवी दिशा मिळते. कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्ही शिक्षकांना मानाचा मुजरा अर्पण केला. हा सोहळा सर्वांसाठी संस्मरणीय ठरला. रोटरी क्लब लातूर सतत समाजासाठी उपयुक्त प्रकल्प राबवत आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले आहे. चला, आपण मिळून गांधीजी आणि शास्त्रीजींच्या मूल्यांना प्रेरणा मानून समाजासाठी नवी वाट चोखाळूया.

आपला,

**- रो. जकी खान कायमखानी**
अध्यक्ष, रोटरी क्लब लातूर



दिव्य मराठी लातूर जिल्हा 10-09-2025

रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर ॲस्पिरेशन चा शिक्षक गौरव सोहळा हर्षोल्हासात संपन्न



दिव्य मराठी लातूर जिल्हा 09-09-2025

राष्ट्रउभारणीत शिक्षकांचे अमुल्य योगदान

रोटरी क्लबकडून शिक्षकांच्या गौरवावेळी प्राचार्य डॉ. पूनम नाथानी यांचे भाष्य



लोकमत

रोटरी क्लबकडून शिक्षकांचा गौरव

# कुटुंब प्रबोधन : आजच्या काळाची महत्त्वाची गरज

आपली भारतीय समाजव्यवस्था ही संपूर्ण जगामध्ये आदर्शवत मानली जाते. ही समाजव्यवस्था आदर्शवत ठेवण्यास्तव आपली कुटुंबव्यवस्था मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरली आहे. अनेक देशातील विद्वानांनी



आपल्या कुटुंबव्यवस्थेवर अभ्यास करुन आपापल्या देशांमध्ये राबवण्यासाठी प्रयत्न केलेले आ-हेत. पण गेली काही वर्षे भारतीय कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त करण्याचे अनेक प्रयत्न विविध मार्गांनी होत आहेत. विशेषत: गत १५ ते २० वर्षांमध्ये या कुटुंबव्यवस्थेचा अंगभूत भाग असलेली विवाहसंस्था मोडीत काढण्याचे / तिला खिळखिळी करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात होत असल्याचे आपल्या निदर्शनास येत आहे. यामध्ये लिव्ह इन रिलेशनशिप हा एकेकाळी त्याज्य मानलेला प्रकार आज सर्वमान्य होत असल्याचे दिसत आहे. यामध्ये एकमेकांचे व्यक्तीस्वातंत्र्य जपण्याच्या नावाखाली कुटुंबामध्ये एकत्रित होत असलेले प्रबोधन कमी होण्यामुळे असे प्रकार होत असल्याचे दिसत आहे.

कुटुंब हा समाजाचा सर्वात लहान पण अतिशय सुदृढ असा घटक आहे. जोपर्यंत कुटुंब सुदृढ आहे तोपावेतो समाजही सुदृढ राहतो. कुटुंब हे संस्काराचे उगमस्थान आहे. कुटुंबातूनच संस्कार प्रत्येक व्यक्तीमध्ये रुजवले जातात आणि कुटुंबातूनच व्यक्तीनिर्माण होत असते. जे संस्कार कुटुंबातील विविध व्यक्तींकडून होत असतात ते अखेरपर्यंत अबाधित राहतात. कुटुंबातील प्रत्येकालाच वाटत असते की आपलं कुटुंब हे सुसंस्कारीत, सुसंस्कृत व आदर्श कुटुंब असावं आणि यामधील प्रत्येक व्यक्ती ही समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून गणली जावी. पण गत काही वर्षांमध्ये परिस्थितीबदलामुळे / पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्याच्या वृत्तीमुळे कुटुंबातील एकता कमी होत चालली आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आपले विचार निष्प्रभ होत चालले आहेत. म्हणून आपले सर्वांचे विचार पुनरूज्जीवित करणे



अत्यावश्यक आहे. ज्या संस्कारांमुळे आपण जगातील एक आदर्श समाजव्यवस्था म्हणून ओळखले जात होतो, जे संस्कार भारताला समृद्ध बनवण्यासाठी कारणीभूत ठरुन मानवतेला तारणार आहेत ते संस्कार सहजपणे होण्यासाठी आपणच प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेली संस्कारांची शिदोरी आपण पुढील पिढीकडे सहजपणे सुपूर्द करणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटुंब प्रबोधनाची खूप मोठी आवश्यकता आहे. पण हे कोणी बाहेरून येऊन करणार आहे किंवा करावे लागणार आहे असे नव्हे. तर त्यासाठी आपणच आपापल्या कुटुंबामध्ये ते करणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटुंबात असलेल्या सर्व सदस्यांनी आपापसातील संवाद वाढवणे आवश्यक आहे. कुटुंबातील सर्व सदस्यांनी किमान एक वेळ निश्चित करुन एकत्रित बसून दिवसभरातील एकमेकांच्या समस्यांचा / कौटुंबिक समस्यांचा एकत्रित विचार करुन एकमेकांच्या सहाय्याने त्या कशा सोडवता येतील याचा विचार करणे आवश्यक आहे. एकमेकांच्या तब्येतीची चौकशी दिवसभरात एकदा तरी करणे आवश्यक आहे.

आपापल्या आराध्यदेवतेचे पूजन एकत्रित करणे, कुटुंबात वारशाने आलेले धार्मिक उत्सव एकत्रितरीत्या साजरे करणे आवश्यक आहे. यामधून आपले कुटुंब सुसंस्कारीत व समाजमान्य होण्यास फार मोठी मदत होणार आहे व त्याचा फायदा एक चांगला समाज निर्माण होण्यासाठी होणार आहे आणि तो पुढे एका भक्कम, सुसंस्कारीत व समृद्ध राष्ट्रनिर्माणासाठी होणार आहे हे निश्चित. त्यादृष्टीने आपण सर्वजण प्रयत्न करुया आणि आपल्या भारतीय समाजव्यवस्थेला संपूर्ण जगामध्ये वरच्या स्थानावर नेण्यासाठी प्रयत्न करु या!

- अभि. रो. महेंद्र जोशी, लातूर.

## रो.संजय निलेगांवकर यांचे रोटरी क्लबकडून स्वागत

लातूर : येथील यशस्वी युवा उद्योजक रो.संजय



निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समिती सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. निवडीबद्दल रोटरी क्लब लातूरच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

रो. संजय निलेगांवकर यांच्यावर यापूर्वी मध्य रेल्वेच्या लातूर स्थानिक सल्लागार समिती सदस्यपदाची जबाबदारी होती. त्यावेळी त्यांनी रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. माल वाहतुकीसंदर्भातील समस्या मांडून त्या समस्यांची सोडवणूक यशस्वीपणे करण्याचे कामही त्यांनी केले आहे. रेल्वेशी संबंधित समस्यांचा त्यांना चांगला अभ्यास आहे. लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाचे मुख्य महाव्यवस्थापकांकडे शिफारस केली होती. त्यांच्या शिफारसीनुसार वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी निलेगांवकर यांना नियुक्तीपत्र प्रदान केले आहे.

रो. संजय निलेगांवकर यांच्या नियुक्तीबद्दल रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी, सचिव विश्वनाथ निगुडगे, रो. हरीप्रसाद सोमाणी, सतीश बोरा, सुनील कोचेटा यासह सर्व रोटरीयन्सनी त्यांचे स्वागत केले आहे.


दिव्य मराठी लातूर जिल्हा 01-10-2025

जागतिक हृदय दिनानिमित्त रोटरी सॅटेलाईट क्लब तर्फे सीपीआर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

लोकमत समाचार

राष्ट्र के निर्माण में जुटे हैं शिक्षक : नाथानी

# मोबाईल व्यसन : मनाला जखडणारा अदृश्य सापळा

आजच्या डिजिटल युगात मोबाईल हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आजचं जग मोबाईलशिवाय अशक्य वाटतं. संवाद साधणं, नातलगांशी संपर्क ठेवणं, ऑनलाईन बँकिंग, खरेदी, कामाच्या मीटिंग्ज, शिक्षण, मनोरंजन - सर्व काही मोबाईलवर उपलब्ध आहे. पण हाच मोबाईलचा अतिरेक व्यसन म्हणून आपल्या मनाला जखडून ठेवतो आहे.

**मोबाईल व्यसन म्हणजे काय?**

व्यसन म्हणजे अशी सवय की जिच्याशिवाय माणूस अस्वस्थ होतो. दारू, सिगारेट किंवा ड्रग्जप्रमाणेच आज मोबाईलही अनेकांसाठी व्यसनाचं साधन बनलं आहे. सतत मोबाईल हातात असणं, नोटिफिकेशन आलं नाही तरी वारंवार स्क्रीन तपासणं, सोशल मीडियावर तासन्तास घालवणं, मोबाईल हरवल्यास अस्वस्थ होणं ही काही ठळक लक्षणं आहेत.



**जागरूकतेने बदललेलं जीवन**

अभिजित नावाचा महाविद्यालयीन विद्यार्थी दिवसभर मोबाईलमध्येच रमायचा. ऑनलाइन गेम्स, सोशल मीडिया, व्हिडिओ यात त्याचे तासन्तास जायचे. सुरुवातीला मजा वाटायची, पण नंतर अभ्यासाकडे लक्ष कमी झालं, मित्रांपासून तो दूर गेला आणि सतत चिडचिड करू लागला. शेवटी त्याच्या आई-वडिलांनी त्याला Digital Detox कॅम्पमध्ये पाठवलं. तिथे त्याने मोबाईलशिवाय दिवस कसा घालवायचा, मनाशी संवाद कसा साधायचा आणि छंदातून समाधान कसं मिळवायचं हे शिकलं. आज अभिजीत पुन्हा आत्मविश्वासाने जगतो आहे.

ही कहाणी आपल्याला दाखवते की मोबाईल व्यसनावर नियंत्रण मिळवणं अवघड नाही, फक्त जागरूक प्रयत्नांची गरज आहे.



**मनोवैज्ञानिक दृष्टिकोन**

Mind Nurture Expert म्हणून मला जाणवतं की मोबाईल व्यसन हे फक्त सवय नाही, तर ते मनावर परिणाम करणारी एक मानसिक साखळी आहे.

**डोपामिन ट्रिगर** - प्रत्येक नोटिफिकेशन किंवा लाईक, मेंदूत डोपामिनची लहर निर्माण करतो.

**रिकामेपणाची भीती** - मोबाईलशिवाय वेळ घालवता येत नाही, कारण मन शांततेला घाबरतं.

**स्वत:कडून दूर जाणं** - मोबाईलवर तासन्तास घालवल्यानं स्वत:शी संवाद हरवतो.

**मोबाईल व्यसनाचे दुष्परिणाम**

**मानसिक आरोग्यावर परिणाम** - झोप न लागणे, एकाग्रतेचा अभाव, नैराश्य, चिंता आणि चिडचिड वाढते.

**शारीरिक त्रास** - डोळ्यांवर ताण, डोकेदुखी, मानेचे व कंबरेचे दुखणे, लठ्ठपणा यासारखे प्रश्न.

**कौटुंबिक व सामाजिक दुरावा** - मोबाईलमुळे प्रत्यक्ष संवाद कमी होतो. घरात एकमेकांशी बोलण्याऐवजी सर्वजण आपल्या मोबाईलमध्ये गुंतलेले दिसतात.

**शैक्षणिक व व्यावसायिक नुकसान** - विद्यार्थ्यांचा अभ्यास ढासळतो, कर्मचाऱ्यांची उत्पादकता कमी होते.

**अपघातांची वाढ** - रस्त्यावर चालताना किंवा वाहन चालवताना मोबाईल वापरण्यामुळे गंभीर अपघात होतात.

**उपाय- मनाला पोषण देण्याचा मार्ग**

**डिजिटल डाएट** - दिवसातून ठराविक वेळच मोबाईल वापरा.

**Mindful Moments** - रोज किमान १५ मिनिटं मोबाईलशिवाय शांत बसून श्वासोच्छ्वासावर लक्ष केंद्रित करा.

**कौटुंबिक नियम** - जेवणाच्या टेबलावर मोबाईल न वापरण्याचा करार करा.

**छंद आणि खेळ** - वाचन, संगीत, व्यायाम यामुळे मनाला नवी ऊर्जा मिळते.

**Digital Detox Day** आठवड्यातून एक दिवस मोबाईल शक्यतो टाळा.

**२०-२०-२० नियम:** मोबाईल वर काम करताना प्रत्येक २० मिनिटांनी स्क्रीनवरून डोळे काढून २० फूट लांब २० सेकंद बघा.

**मोबाईल व्यसन Self-check Test** : तुम्हाला मोबाईल व्यसन आहे का? खालील प्रश्न प्रामाणिकपणे विचारा:

मोबाईल नसताना तुम्ही अस्वस्थ होता का?

जेवण, अभ्यास किंवा कौटुंबिक वेळेतही मोबाईल हातात असतो का?

झोपण्याआधी व उठल्यावर पहिली गोष्ट मोबाईल बघणं असतं का?

सोशल मीडियावर फक्त ५ मिनिटं म्हणता म्हणता तास जातात का?

मोबाईलमुळे तुमच्या झोपेवर, कामावर किंवा अभ्यासावर परिणाम होतो का?

मित्र-नातलगांशी प्रत्यक्ष भेटीत कमी, पण मोबाईलवर जास्त वेळ घालवता का?

जर ३ किंवा त्याहून अधिक प्रश्नांना हो उत्तर आलं, तर तुम्ही मोबाईल व्यसनाच्या धोक्याच्या टप्प्यावर आहात.

**निष्कर्ष**

मोबाईल हा साधनं आहे, आयुष्य नाही. त्याचा योग्य वापर केला तर तो आपल्याला पुढे नेतो, पण त्याचं व्यसन आपल्याला मागे खेचतं. आजची खरी गरज म्हणजे सजगता – आपण मोबाईलचा वापर करतोय की मोबाईल आपल्याला वापरतोय हे ओळखणं.

Rotarian म्हणून आपली जबाबदारी आहे की समाजाला या अदृश्य व्यसनापासून सावध करावं आणि योग्य मार्ग दाखवावा. Mind Nurture Expert म्हणून मी सांगतो मनाला पोषण देणाऱ्या सवयी जपा, नात्यांना वेळ द्या, स्वत:शी संवाद साधा. मोबाईलला मर्यादेत ठेवा, म्हणजे आयुष्य खऱ्या अर्थाने समृद्ध होईल.

**लाईफ कोच रो. डॉ. आसिफ शेख**

माइंड नर्चर एक्सपर्ट तथा NLP प्रॅक्टिशनर – ९९७५१२४४२७

# राष्ट्रउभारणीत शिक्षकांचे अमूल्य योगदान

## प्राचार्य डॉ. पूनम नाथानी : रोटरी क्लब लातूरने शिक्षकांना केले सन्मानित





**रोटरी क्लब ऑफ लातूरच्या वतीने शिक्षकांचा गौरव करताना मान्यवर.**



**रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर ॲस्पिरेशनच्या वतीने महिला शिक्षकांचा गौरव करण्यात आला.**



**रोटरी क्लब ऑफ लातूरच्या वतीने शिक्षक गौरव सोहळ्याचे वृक्षाला पाणी देऊन उद्घाटन करण्यात आले.**

**लातूर :** प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात शिक्षकाचे अमुल्य योगदान असते. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला सुंदर बनविण्यासाठी शिक्षक प्रयत्नशील असतात. शिक्षक दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब लातूरने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना शिक्षक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केल्याने समाधान वाटत असल्याचे दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पूनम नाथानी यांनी सांगितले.

श्रीकिशन सोमाणी शाळेच्या सभागृहात रविवार,७ सप्टेंबर रोजी शिक्षक गौरव पुरस्कार सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून निलंगा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संतोष स्वामी, राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित प्रा.डॉ. संदीपान जगदाळे, रविशंकर हिंगणे उपस्थित होते. यावेळी विस्तार अधिकारी संतोष स्वामी यांनी रोटरीच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. शिक्षकांचा गौरव करून त्यांच्याप्रती रोटरी क्लब लातूरने कृतज्ञता व्यक्त केल्याचे ते म्हणाले. यावेळी सुधाकर मोरे, मोतीबुवा गोसावी, जमिलाबी पटेल, गीतांजली कवडे, जालिंदर कांबळे, अ.वाजीद शेख, गौसोद्दीन शेख यांचा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ ॲस्पिरेशनच्या वतीने श्रुती गोडे, प्रा.डॉ. अनिता सोनवणे, तृप्ती जेउरकर, फईमबानो सय्यद यांनाही शिक्षक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी हरिप्रसाद सोमाणी, सुरेश पेन्सलवार, मोहन परदेशी, महेंद्र जोशी, डॉ.विनोद लड्डा, रेड्डी सर, अनिल थोरमोटे, नरेश कोरे, प्रवीण होळीकर, प्रवीण रणदिवे, सुशांत कुलकर्णी, पुरुषोत्तम कालिया, रामनिवास धूत, रामप्रसाद राठी, सुनील कोचेटा, ॲड. सतीश दिवाण, गोपाल राठी, कौशल्या सोनकवडे, वनिता लचुरिया, हर्षद राजूरकर, ब्रह्मकुमार सुवर्णकार, विश्वजीत कदम, अनिरुद्ध मुचलमकर यांच्यासह शिक्षक व त्यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन आसीफ सय्यद यांनी केले. आभार सचिव विश्वनाथ निगुडगे यांनी मानले.



रोटरीचे अध्यक्ष जकी खान कायमखानी म्हणाले, शिक्षक आदर्श विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्नशील असतात. शिक्षणातून नैतिकता मजबूत झाली पाहिजे. मग ते कुठलेही क्षेत्र असो. रोटरी क्लब लातूर विविध समाजासाठी सद्भावना व शांतता वाढविणे, आरोग्य व शिक्षण क्षेत्रांमध्ये विविध प्रकल्प राबवून मानवतावादी दृष्टिकोनातून कार्य करते. हाच उद्देश समोर ठेवून विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांना रोटरी क्लब लातूर व रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर ॲस्पिरेशनच्या वतीने गौरवित असल्याचे ते म्हणाले.

# कोणतेही राष्ट्र शिक्षकाविना उंच जाऊ शकत नाही!

काळ झपाट्याने बदलत आहे. आधुनिक युगात ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. जुन्या शैक्षणिक संकल्पना झपाट्याने बदलत आहेत. तंत्रज्ञानाने मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर आपला ठसा उमटविला आहे. शिक्षणक्षेत्र, जे मानवी जीवनाच्या प्रगतीत अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे, तेही या वेगवान बदलांपासून अप्रभावित राहिलेले नाही.



आजच्या या आधुनिक डिजिटल युगात शिक्षणाच्या पद्धतीसुद्धा बदलल्या आहेत. पुस्तकं आणि ब्लॅकबोर्ड यांच्या जागी आता संगणक, मोबाईल आणि डिजिटल वर्गखोली आलेली आहे. आजचे विद्यार्थी बोटांच्या टोकावर ती सर्व माहिती क्षणात मिळवू शकतात, ज्यासाठी पूर्वी बराच वेळ आणि साधनांची आवश्यकता असायची.

नव्या पिढीला तंत्रज्ञानाचा वापर शिकवला गेला नाही, तर त्याचे नकारात्मक परिणामही होऊ शकतात.सध्याच्या काळात शिक्षकाची जबाबदारी फक्त धडा शिकवण्यापुरती मर्यादित राहणार नाही, तर त्याला आधुनिक मानसिक शास्त्र आणि तंत्रज्ञानाची ओळख असणे आवश्यक आहे. शिक्षक आपल्या अनुभव आणि निरीक्षणाच्या प्रकाशात आपल्या विद्यार्थ्यांना मानवतेची क्षमता, नैतिक मूल्ये आणि समृद्ध संस्कृतीची माहिती देऊ शकतो. NEP २०२० मध्ये शिक्षकांना आपल्या समाजात अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त असल्याचे म्हटले आहे. **धोरणानुसार:** शिक्षक आमच्या मुलांच्या भविष्याचे शिल्पकार आहेत आणि त्यामुळे राष्ट्राचे भविष्य देखील घडवितात. त्यांच्या या प्रतिष्ठित भूमिकेमुळे शिक्षकांचा समावेश भारतीय समाजातील सर्वात आदरणीय व्यक्तींच्या यादीत होतो.

उच्च अधिकार आणि अधिक ज्ञानामुळेच समाजाने या शिक्षकांना आणि गुरूंना आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्य आणि नैतिक मूल्ये देण्यासाठी आवश्यक असलेले सर्व काही दिले. शिक्षकांना मिळणारी शिक्षणाची गुणवत्ता, त्यांचे वेतन, सृजनशीलतेसाठी उपलब्ध साधने आणि त्यांना दिले जाणारे अधिकार हे त्यांना खरेतर जे मिळावे त्याइतके नाहीत.

याच कारणास्तव शिक्षकांचा दर्जा आणि त्यांच्यात अध्यापनाप्रती आढळणारा उत्साह अपेक्षित दर्जाचा दिसून येत नाही. त्यामुळे शिक्षकांना वेळोवेळी त्यांच्या चांगल्या कार्याला प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. रोटरी क्लब लातूरने शिक्षकांप्रती आपली कृतज्ञता दाखवून शिक्षक गौरव सोहळा आयोजित केला, शिक्षकांचा सन्मान केला तो शिक्षकांना सदैव प्रेरणा देणारा ठरला आहे. रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी यांची दूरदृष्टी रोटरी क्लब लातूरला एका नव्या उंचीवर नेत आहे, याचे समाधान वाटते. अध्यापनाचा व्यवसाय स्वीकारण्यासाठी, उच्चतम व्यक्तींना प्रोत्साहित करण्याची गरज आहे, ज्यामुळे या व्यवसायाचा गौरव आणि शिक्षकांचा दर्जा पुनर्स्थापित होऊ शकेल. रोटरी क्लब लातूर सारखे कार्यक्रम होणे गरजेचे आहेत.

आपल्या मुलांचे आणि समाजाचे उत्तम भविष्य घडवण्यासाठी शिक्षकांचा उत्साह आणि निर्धार पुनर्स्थापित करणे आणि त्यांना अधिक अधिकारसंपन्न बनवणे आवश्यक आहे. शिक्षकांना आधुनिक युगाशी जुळवून घेण्यासाठी काही टीप्स देत आहे.

**१. शिक्षकाची भूमिका:** शिक्षकाचे जीवन हे अत्यंत वास्तववादी आणि आदर्शवादी असले पाहिजे. त्याचे बोलणे आणि कृती यात सुसंगतता असणे आवश्यक आहे. राल्फ वाल्डो इमर्सन त्यांच्या लेटर्स अँड सोशल एम्स'मध्ये म्हणतात, **तुम्ही जे काही आहात त्याचा प्रभाव इतका जास्त असतो की तुम्ही जे काही बोलता ते ऐकू येत नाही.** याचा स्पष्ट अर्थ असा आहे की तुमचे वर्तन बोलते. तुमचे वर्तन आणि बोलणे एकसारखे असावे.

**२. नवीन शैक्षणिक प्रवृत्तींची माहिती:** जागतिक स्तरावर शैक्षणिक विचार आणि प्रवृत्तींबद्दल शिक्षकाला माहिती असणे आवश्यक आहे. जगात कोणती शैक्षणिक प्रणाली प्रचलित आहे आणि जगातील देश कोणत्या पद्धती वापरत आहेत, याची त्याला माहिती असावी, जेणेकरून तो आपल्या विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करू शकेल. कोठारी आयोगाने म्हटले होते की, भारताचे भविष्य त्याच्या वर्गखोल्यांमध्ये घडत आहे. या खऱ्या भविष्याला योग्य मार्गदर्शन आणि घडवण्यासाठी आपल्याला सर्वोत्तम जागतिक प्रणालींचा विचार करणे आवश्यक आहे.

**३. फावल्या वेळेचा योग्य कामांमध्ये उपयोग करण्याची सवय:** शिक्षकाने आपल्या २४ तासांना विशिष्ट वेळापत्रकानुसार वाटून घ्यावे आणि आपला फावला वेळ स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी आणि नवीन ज्ञान मिळवण्यासाठी समर्पित करावा. **४. संशोधन आणि समजून घेण्याचे महत्त्व:** प्रत्येक शिक्षकाने नवीन संशोधनाबद्दल अत्यंत जागरूक असले पाहिजे आणि त्याद्वारे आपल्या क्षेत्राची माहिती करून घेतली पाहिजे.

**५. प्रारंभिक प्रशिक्षण:**

यामध्ये दर्जेदार व्यावसायिक प्रशिक्षण, नवीन अध्यापन पद्धती आणि कौशल्ये यांचा समावेश आहे.

**※ सततचे प्रशिक्षण:** जमिनीवरील पुस्तक आणि परिस्थितीनुसार प्रशिक्षण दिले जाते.

६. नवीन शैक्षणिक साधनांपर्यंत पोहोचणे, जसे की संगणक, प्रोजेक्टर, डिजिटल क्लासरूम, पॅनल बोर्ड, इत्यादी.

**७. अभ्यास आणि संशोधन:**

※ शिक्षकाने नेहमी पुस्तके आणि लेखांमधील फरक लक्षात ठेवला पाहिजे, परंतु हे त्याच्या शिकवण्यामध्ये प्रतिबिंबित झाले पाहिजे.

※ अभ्यासाची आवड त्याच्या मदतीने कायम राहिली पाहिजे, ही आधुनिक काळाची एक अत्यंत महत्त्वाची गरज आहे.

**४. पुनरावलोकन आणि मेट्रिक्सचे महत्त्व:** आपल्या संस्थांनी सततचे फायदे आणि मेट्रिक्सची प्रणाली स्थापित केली पाहिजे, ज्यामुळे शिक्षकांना त्यांची शैक्षणिक आणि अध्यापन स्थिती समजून घेता येईल आणि त्या सुधारण्यास मदत होईल.

या सर्व मुद्द्यांव्यतिरिक्त, शिक्षकाने अत्यंत उच्च चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्वाचा मालक असला पाहिजे.

त्याच्या पोशाख आणि वागण्यात साधेपणा आणि शुद्धता असावी.

एखादी व्यक्ती क्रोध आणि रागाने भरलेली असली तरी, तिने शांत मनाने अडचणी सोडवाव्यात आणि जबाबदारीची भावना बाळगावी. जो व्यक्ती चांगल्या स्वभावाचा, सहनशील, दृढनिश्चयी, सहानुभूतीशील आणि परोपकारी असतो, त्याचे जीवन नियमांनुसार चालते. आधुनिक कौशल्यांच्या मदतीने तो यशस्वी होऊ शकतो, ज्याच्या मदतीने आपण नातेसंबंध अधिक मजबूत करू शकतो. सर्वगुणसंपन्न शिक्षकच आधुनिक भारताचे विश्वगुरु होण्याचे स्वप्न पूर्ण करू शकतात.

**- प्रा. अब्दुल वाजीद रशीद**
**डॉ. जाकीर हुसैन हायस्कूल, लातूर.**

# रोटरी क्लब लातूरतर्फे हजरत सुरतशाह उर्दू हायस्कूलमध्ये शैक्षणिक साहित्याचे वितरण तर डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम मनपा शाळा क्र.१५ ला साऊंड बॉक्स भेट



लातूर : शहरातील हजरत सुरत शाह उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज मध्ये रोटरी क्लब लातूरने होतकरू आणि हुशार मुलांना शैक्षणिक साहित्याचे १२ कीट वाटप करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकीखान कायमखानी, रो. मोहन परदेसी, रो. डॉ. विनोद लड्डा, मल्लिकार्जुन कलशेट्टी, रो. महेंद्र जोशी, रो. एन.एस. रेड्डी यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप केले.

कार्यक्रमास मुख्याध्यापक ईनायत सय्यद, शिक्षक गौसोद्दीन शेख, मुस्तफा सय्यद, रहेमान तांबोळी, फयाज जळकोटे आदींसह विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी रो. जकी खान कायमखानी म्हणाले, शिक्षक विद्यार्थ्यांना घडविणारा शिल्पकार असतो. आणि विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे ऐकल्यास ते यशाला गवसणी घालू शकतात. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते पवित्र आहे. हे पवित्र बंधनच उद्याचा यशस्वी भारत घडवू शकते.

डॉ. विनोद लड्डा म्हणाले, शिक्षणातून समृद्धी निश्चित मिळते. शिक्षकांनी अध्ययन आणि अध्यापन कार्यात झोकून देत कार्य केल्यास आपला व संस्थेचा नावलौकिक निश्चित होतो. विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षकाचा मोलाचा वाटा असतो. यावेळी सूत्रसंचालन मुस्तफा सय्यद यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक इनायत सय्यद तर आभार गौसोद्दीन शेख यांनी मानले. यावेळी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकीखान कायमखानी यांना उत्कृष्ट कार्य करत असल्याबद्दल हजरत सूरतशाह संस्थेकडून सन्मानित करण्यात आले.

लातूर : शहरातील मनपा शाळा क्रं. १५ येथे रोटरी क्लब लातूरच्या वतीने साउंड सिस्टीम देण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष जकी खान कायमखानी, रो. मोहन परदेसी, रो. डॉ. विनोद लड्डा, रो. एन.एस. रेड्डी, आसिफ शेख यांची उपस्थिती होती.




यशस्वी होण्यासाठी डिसीप्लीनची नितांत गरज आहे. विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास केला तर यश हमखास मिळते. परीक्षेपूर्वीच अभ्यास केला पास होता येईल मात्र अपेक्षित यश मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सचोटीने अभ्यास करणे गरजेचे आहे. मनपा क्र. १५ ची ही शाळा शिक्षकांनी सजवली असून, आदर्शवत आहे. खरेतर शिक्षक शाळेसह विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देऊ शकतात. शाळेतील बोलक्या भिंती विद्यार्थीप्रिय आणि ज्ञानाने भरपूर अशा होत्या. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका शेहराज रहीम शेख, स.शिक्षक रिनाज अजीज पठाण, खान नविदुसहेर फिरोज यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.






रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल हजरत सुरतशाह हायस्कूलतर्फे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.




**अधिक माहितीसाठी संपर्क :** कायमखानी पेट्रोल पंप, अंबाजोगाई रोड, लातूर. मो. ९८२३११६०७०
**संपादक :** रो. नागनाथ कलवले. ९७६४७ ८८२८८
**डिझाईन, लेआऊट –** एम.एस. मीडिया, लातूर ८८३०२७३०३८